आर.सी.सी.क्र.१७२/२०२१
शासन वि. बाबा उर्फ बापुराव व इतर
निशाणी क्र. ८१

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांचा जबाब –**

| | | |
|---|---|---|
| नांव | : | जयराम सोमला राठोड, |
| वय | : | ५६ वर्षे |
| व्यवसाय | : | पोलीस हवालदार/३४२, |
| पत्ता | : | पोलीस मुख्यालय, धाराशिव. |

**सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस. धुमाळ सरकार पक्षातर्फे –**

**१.** सन २०१५ ते सन २०२० पर्यंत मी पोलीस स्टेशन तामलवाडी येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. दिनांक १५/०७/२०२० रोजी पोलीस ठाणे अंमलदार श्रीमती. व्ही.एन. जाधव ब.नं. ११९९ यांनी सदर प्रकरणातील फिर्यादी यांनी त्यांना झालेल्या मारहाणीबाबत तक्रार दिल्यावरुन गुन्हा नोंद केला. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे दिला. त्याचा गुन्हा क्र.१००/२०२० असा होता. तपास मिळाल्यानंतर फिर्यादीचे बारकाईने अवलोकन केले. घटनास्थळ हे गोंधळवाडी गावाचे दक्षिणेस एक किलोमीटर अंतरावर बाबा उर्फ बापुराव रानबा शिरगिरे यांचे शेतातील बांधावर होते. घटनास्थळावर नमुद दिवशी पंचासह जावून घटनास्थळ पंचनामा सायंकाळी १७.०५ ते १७.५० या दरम्यान तयार केला. फिर्यादी हे देखील घटनास्थळावर हजर होते. फिर्यादीने घटनास्थळ दाखविले होते. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा हा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. नमुद पंचनाम्यावर माझी व दोन पंच नामे राम

भगवान मारकड व श्रीकृष्ण अशोक माने यांच्या सहया आहेत. घटनास्थळ पंचनाम्यास यापुर्वीच निशाणी क्र. ३४ देण्यात आलेले आहे. घटनास्थळावर पंचनामा करतेवेळेस छायाचित्र घेण्यात आले होते. आता मला दाखविण्यात आलेले छायाचित्र तेच आहे. त्यामध्ये मी स्वतः, दोन पंच व फिर्यादी हजर आहोत. सदर छायाचित्रास **वस्तु क्रमांक 'क'** देण्यात आले.

२. तदनंतर तपासात साक्षीदार यांची चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविण्यात आले. मी साक्षीदार नामे शांता सागर बंडगर यांनी सांगितल्यप्रमाणे त्यांचा जबाब नोंदविला होता. आता मला दाखविण्यात आलेला शांता सागर बंडगर यांचा जबाब हा तोच आहे. त्यातील अधोरेखांकित भाग 'अ' त्यांनी सांगितल्याप्रमाणे लिहिण्यात आलेला आहे. त्यास **निशाणी क्र. ८२** देण्यात आले.

३. तपासात आरोपींचा गुन्हयात सहभाग असल्याचा आढळून आला. दिनांक १८/०७/२०२० रोजी आरोपी त्यांचे घरी मिळुन आले. त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडुन गुन्हयात वापरण्यात आलेले हत्यार जप्त करण्यात आले. आरोपी लक्ष्मण शिरगिरे याच्या ताब्यातुन लोखंडी सळई जप्त करण्यात आली. त्याबाबत जप्ती पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला. आता मला दाखविण्यात आलेला जप्ती पंचनामा हा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी, दोन पंच व आरोपी लक्ष्मण शिरगिरे याची स्वाक्षरी आहे. त्यास **निशाणी क्र. ८३** देण्यात आले. तसेच आरोपी बाबा उर्फ बापुराव शिरगिरे याच्या ताब्यातुन चाबुक जप्त करण्यात आला. त्याबाबत जप्ती पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला. आता मला दाखविण्यात आलेला जप्ती पंचनामा हा तोच आहे. त्यातील

मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी, दोन पंच व आरोपी बाबा उर्फ बापुराव शिरगिरे याची स्वाक्षरी आहे. त्यास **निशाणी क्र. ८४** देण्यात आले. आता मला जप्त चाबुक वस्तु क्रमांक 'अ' व लोखंडी सळई वस्तु क्रमांक 'ब' दाखविण्यात आले. ते तेच आहेत. जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला व त्याबाबत मुद्देमाल पावती तयार केली होती.

४. आरोपींना कलम ४१ फौ.प्र.सं. अन्वये नोटीस देण्यात आली. तदनंतर प्राथमिक आरोग्य केंद्र, काटगाव यांना जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेबाबत पत्र दिले होते. आता मला दाखविण्यात आलेले पत्र हे तेच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ८५** देण्यात आले. त्यानुसार जखमी फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले.

५. तपासात अंतर्गत असे निष्पन्न झाले की, आरोपी क्र. २ ने फिर्यादीस लोखंडी सळईने उजव्या बाजुस डोक्यात मारुन जखमी केले, तसेच आरोपी क्र. १ ने फिर्यादीस चाबकाने डाव्या हाताच्या मनगटावर व अंगावर मारहाण केली, आरोपी क्र. ३ व ४ यांनी फिर्यादीस शिवीगाळ केली, तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी दोन आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. पी.टी. वट्टे यांचे तर्फे –**

६. घटनास्थळ हे नेमके कोणाच्या मालकीचे होते याबाबत मी कागदोपत्री पुरावा पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जबाब नोंदवितेवेळी श्रीकृष्ण अशोक माने हा फिर्यादी

धुळाबाचा भाचा, शांता बंडगर ही फिर्यादीची मुलगी व संभाजी मोटे फिर्यादीचा मावसभाऊ असल्याचे मला माहिती होते. हे म्हणणे खरे आहे की, जप्त लोखंडी सळई वस्तु क्रमांक 'ब' सारख्या सळई या बांधकामावर वापरल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, जप्त चाबुक वस्तु क्रमांक 'अ' सारखे चाबुक हा ग्रामीण भागातील प्रत्येक शेतक–याकडे असतात. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात मी नमुद केल्याप्रमाणे कोणताही तपास केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटया गुन्हयात मी खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा माझा ओळखीचा असल्याकारणाने आरोपींना सदर प्रकरणात गोवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

MUKKANWAR ANUPAM RAJENDRA
Digitally signed by MUKKANWAR ANUPAM RAJENDRA
Date: 2026.04.22 19:07:27 +0530

ठिकाण– तुळजापुर. (अ.रा. मुक्कनवार)
दिनांकः २२/०४/२०२६ प्रथमवर्ग न्यायादंडाधिकरी,
तुळजापूर.(कोर्ट नं.३)